दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे **अक्षय संभाजी कामठे** (संपादक पुणे आवृत्ती)
**निखिल गोळे** (आवृत्ती सहसंपादक),**नयनिश गोळे** (आवृत्ती कार्यकारी संपादक)

पुणे || वर्ष ६ वे || अंक १०५ || रविवार, १२ एप्रिल २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




# कामगार कायद्यातील सुधारणांमुळे कामगारांबरोबरच उद्योगांनाही फायदा – मंत्री ॲड. आकाश फुंडकर

मुंबई, : केंद्र सरकारने विविध कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करून चार व्यापक कामगार संहितांमध्ये रूपांतर केले असून, यामुळे कामगार कायदे अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी होणार आहेत. यामुळे कामगारांचे हक्क बळकट होण्याबरोबरच उद्योगांसाठी सुसंगत व सुलभ नियामक व्यवस्था उपलब्ध होईल, असे प्रतिपादन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागांतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत आयोजित ''नारायण मेघाजी लोखंडे व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य पुरस्कार २०२५'' वितरण कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडला, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, संचालक (बाष्पके) श्री. ध. प्र. अंतापूरकर तसेच वरिष्ठ अधिकारी व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध उद्योग क्षेत्रांतील



सुमारे १६०० कारखाना प्रतिनिधींनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली.

यावेळी राज्यातील सुरक्षा व आरोग्य विषयक उत्कृष्ट कामगिरीबद्दल धोकादायक तसेच धोकादायक नसलेल्या उद्योगांचा गौरव करण्यात आला. विविध श्रेणींमध्ये एकूण २४ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. औद्योगिक संरचनेमध्ये लवचिकता आणल्यामुळे उद्योग आणि कामगार दोघांनाही फायदा झाला आहे. यामुळे उत्पादकतेत वाढ झाली आहे.

उद्योगांना चालना देतानाच कामगारांचे हित जपण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून २०१४ पासून देश व राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण झाले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग आणि कामगार या दोघांचेही हित जपले जात असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना जलद सेवा मिळावी यासाठी मानवी हस्तक्षेपविरहित प्रणालीवर सरकारचा भर असून विविध सेवा ऑनलाइन केल्या जात आहेत. यामुळे तक्रारींचे त्वरित निवारण होण्यास मदत होत आहे.

महिला कामगारांच्या सक्षमीकरणासाठी, पूर्वी प्रतिबंधित असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये महिलांना काम करण्याची संधीसुद्धा देण्यात आली आहे. आवश्यक सुरक्षा उपायांनुसार, रात्री पाळीत काम करण्याचीसुद्धा परवानगी देण्यात आली आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे औद्योगिक राज्य असून कामाचा ताण असतानाही कामगार विभागाचे अधिकारी सक्षमपणे काम करत आहेत. प्रशासन उद्योगांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रधान सचिव श्रीमती कुंदन यांनी नवीन कामगार संहितेमुळे वेतन, औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि व्यावसायिक सुरक्षितता या क्षेत्रांमध्ये एकसंध व सुसंगत कायदेशीर चौकट निर्माण होऊन यामुळे कामगारांना अधिक सुरक्षितता, आरोग्यदायी कामाचे वातावरण आणि सामाजिक सुरक्षा लाभ मिळतील, तसेच उद्योगांना प्रक्रियेत सुलभता आणि स्पष्टता प्राप्त होईल, असे नमूद केले.िऔद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे संचालक दीपक पोकळे यांनी प्रास्ताविक करताना नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विषयावर पॅनल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२०' या विषयावर प्रशिक्षण सत्रही पार पडले. औद्योगिक सुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने दि. १२ एप्रिल २०२६ रोजी नवी मुंबईतील पाल्म बीच रोड येथे '  -२०२६' या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

## इराणी चलनाचे मूल्य घसरल : अंडे सव्वा लाखाला एक.. तर दूध प्रतिलिटर ८ लाख रुपये!

तेहरान : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला धमकी दिली की, तुम्हाला पाषाण युगात पाठवीन. आता त्यापेक्षाही भयानक अवस्था इराणमध्ये आहे. तिथे एका अंड्याचा भाव सव्वालाख रुपये तर एक लिटर दुधासाठी ८ लाख रुपये मोजावे लागत आहेत.

भारतात साधारण एका अंड्याचा भाव ८ ते ९ रुपये आहे. एक लिटर दूध ५५ ते ५६ रुपयांना मिळते. इराणमध्ये एक डझन अंड्याचा दर १५ लाख रियाल पर्यंत जाऊन पोहोचला आहे. एक लिटर दुधाची किंमत ८ लाख रुपयांपर्यंत आहे. एक किलो तांदळाचा भाव ३२ लाख रियाल आहे. १ किलो मटण एक कोटी रुपयांना मिळत आहे. एक डॉलर विकत घेण्यासाठी साडेसोळा लाख रियाल मोजावे लागत आहेत. इराण युद्ध जिंकल्याचा दावा करतोय. पण दुस-या बाजूला इराणची अर्थव्यवस्था मोडकळीस आली आहे.

आज इराणचे चलन म्हणजे फक्त एक कागदी तुकडा आहे. त्यापेक्षा त्याला जास्त महत्त्व उरलेले नाही. अधिकृत आकडे आणि फ्री मार्केटचे वास्तव यात जमीन-अस्मानचे अंतर आहे. एप्रिल २०२६ चया सुरुवातीलाच एका अमेरिकी डॉलरची किंमत जवळपास १,६५०,००० रियाल झाली आहे. भारतीय रुपयाशी तुलना केल्यास एक रुपयाचे मूल्य १७,२०० इराणी रियाल होतात. इराणी चलनाचं मूल्य इतकं वेगाने घसरत आहे की, इराणच्या केंद्रीय बँकेने नुकतीच एक कोटी म्हणजे १० मिलियन रियालची नोट जारी केली. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत ७ डॉलरच्या आसपास आहे. आर्थिक एक्सपर्टस्नुसार ज्यावेळी कुठल्या देशाच्या चलनात इतक्या वेगाने घसरण होते, तेव्हा ते फक्त पैशांचे नुकसान नसते तर नागरिकांचे भविष्य देखील रसातळा जाते.रिचर्ड नेफ्यू यांनी त्यांच्या 'द आर्ट ऑफ सँक्शन्स' या पुस्तकात लिहिले आहे की, फक्त अर्थव्यवस्थेचे नुकसान करणे एवढाच प्रतिबंधांचा उद्देश मर्यादित नसतो, तर जनतेची मानसिक कणखरता मोडणे हा सुद्धा हेतू असतो. इराणमध्ये अमेरिका हाच खेळ खेळत आहे.

यावेळी त्यांच्या रडारवर फक्त तेल नाही

इराणने माघार घेतली नाही तर त्यांना 'स्टोन एज' म्हणजे पाषाण युगात पाठवू अशी धमकीच अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. ट्रम्प यांनी इराणची वीज केंद्रं आणि पुलांना लक्ष्य करण्याचा इशारा दिला होता. त्यांनी दिलेली डेडलाईन संपायला अवघा एक तास उरला असताना या युद्धात सीजफायरची घोषणा झाली. २०२६च्या सुरुवातीलाच ट्रम्प प्रशासनाने इराण विरुद्ध दबाव टाकण्याची खेळी सुरू केली. यावेळी त्यांच्या रडारवर फक्त तेल नव्हतं. इराणचा ड्रोन कार्यक्रम, मिसाईल सेक्टर आणि समुद्री शिपिंग नेटवर्क सुद्धा होते.

# एप्रिल ते जून अन्नधान्याचे आगाऊ वितरण प्रक्रिया प्रभावीपणे सुरू

मुंबई, : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत एप्रिल ते जून २०२६ या कालावधीतील अन्नधान्याची आगाऊ उचल करून तात्काळ वितरण करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिल्यानंतर राज्य शासनाने या प्रक्रियेला वेग देत युद्धपातळीवर अंमलबजावणी सुरू केली आहे. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले असून सर्व यंत्रणा सक्रिय करण्यात आल्या आहेत, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या दि. २ मार्च २०२६ च्या निर्देशानुसार राज्यात तातडीने पूर्वतयारी सुरू करण्यात आली. त्यानुसार दि. ९ मार्च रोजी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगाऊ उचल प्रक्रियेचे नियोजन, साठा व्यवस्थापन आणि वितरण यंत्रणा सक्षम करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी दि. १० मार्च रोजी सर्व जिल्ह्यांना निर्देश पाठविण्यात आले.

यानंतर दि. ११ मार्च रोजी भारतीय अन्न महामंडळाच्या माध्यमातून आगाऊ उचल संदर्भात आणखी एक बैठक घेण्यात आली. पुढे दि. १७ मार्च आणि २४ मार्च रोजी सर्व जिल्ह्यांना अन्नधान्य उचल आणि वितरणाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. या प्रक्रियेचा आढावा केंद्र सरकारनेही घेतला असून दि. ६ आणि ७ एप्रिल रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील प्रगतीची समीक्षा करण्यात आली.

अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी दि. ८ एप्रिल रोजी भारतीय अन्न महामंडळाच्या जनरल मॅनेजर यांच्यासोबत विशेष बैठक घेण्यात आली. त्याच दिवशी सर्व जिल्हा




पुरवठा अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे अन्नधान्य दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत उचलून वितरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

वाहतूक व्यवस्थेलाही प्राधान्य देण्यात आले असून संबंधित कंत्राटदारांना पुरेशी वाहने उपलब्ध करून देण्याच्या सूचना दि. ८ एप्रिल रोजी देण्यात आल्या आहेत. त्यामुळे अन्नधान्याची उचल आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत वितरण सुलभ होणार आहे.

दरम्यान, मार्च २०२६ महिन्याचे वितरण वेळेत पूर्ण न झाल्याने केंद्र शासनाने दि. ७ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्या अनुषंगाने - प्रणालीवर वितरण सुरू होते. त्यानंतर दि. ८ एप्रिलपासून एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे एकत्रित वितरण - मशीनद्वारे सुरू करण्यात आले आहे. सध्या कोणत्याही - यंत्रणेत तांत्रिक अडचण नसून वितरण प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाकडून अन्नधान्य उचल आणि वितरणासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले असून भारतीय अन्न महामंडळ व जिल्हास्तरीय यंत्रणांशी सातत्याने संपर्क ठेवून येणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण केले जात आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशांची गांभीर्याने दखल घेत राज्य शासनाने या तीन महिन्यांच्या आगाऊ वितरण मोहिमेला गती दिली असून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, यासाठी सर्वतोपरी उपाययोजना केल्या जात आहेत, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# नाशिकमध्ये अपघातानंतर पिकअपने पेट घेतला; चौघांचा होरपळून मृत्यू

नाशिक : सिन्नरमध्ये भीषण अपघातामध्ये चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या आगीमध्ये होरपळून चौघांचा मृत्यू झाला. तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जागरण गोंधळाच्या



कार्यक्रमावरून परत येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सिन्नर तालुक्यात पंचाळेजवळ हा भीषण अपघात झाला. ट्रक आणि पिकअपची समोरासमोर धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या अपघातामध्ये बाहेर फेकल्या गेलेल्या एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर तिघांना पिकअपमधून बाहेर पडता न आल्याने त्यांचा होरपळून मृत्यू झाला. मध्यरात्री या अपघाताची माहिती मिळताच सिन्नरच्या रुग्णवाहिका, सिन्नर नगरपालिकेचे अग्निशमन दल, एमआयडीसीचे अग्निशमन दल आणि एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मध्यरात्री मदतकार्य केले. या अपघातामध्ये जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी सिन्नर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. अपघातामध्ये मृत्यू झालेले चौघे जण सिन्नर तालुक्यातील पंचाळे गावातील रहिवासी होते. मृतांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले.

मृतांमध्ये पती-पत्नीचा समावेश आहे. पिकअप चालक किरण रवींद्र मोरे (२५ वर्षे), शुभम गणेश नवले (२२ वर्षे), रिंकू शुभम नवले (१९ वर्षे), मीराबाई विश्वनाथ गांगुर्डे (३५ वर्षे) अशी मृतांची नावं समोर आली आहेत. सचिन गणेश नवले, सुनीता गणेश नवले हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

सूर्योदय
रविवार, १२ एप्रिल २०२६

## संपादकीय

### उत्पादन

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे.

जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.

आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो.

तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल.

घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात.

त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.

कोकणात नदी-नाल्यांच्या कडेला, खाडी व समुद्राच्या काठावर डोलणारी नारळाची झाडे दिसतील तशी त्याची काळजीसुद्धा घेतली जाते.

# देव्हारे येथे महाराजस्व शिबीर उत्साहात संपन्न

मंडणगड प्रतिनिधी दि. ११- छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान टप्पा १ अंर्तगत ग्रामिण भागाशी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणा एकाच ठिकाणी उपलब्ध झालेल्या असल्याने नागरिकांनी शिबिराचे माध्यमातून देण्यात आलेल्या सर्व सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे प्रतिपादन निवासी नायब तहसिलदार संजय गुरव यांनी देव्हारे येथे केले. १० एप्रिल २०२६ रोजी अभियानाचे माध्यमातून देव्हारे येथे आयोजीत शिबिरात ते बोलत होते. या कार्यक्रमास सभापती सौ. प्रणाली चिले, जिल्हा परिषद सदस्य प्रताप घोसाळकर, उपसभपाती दीपक मालुसरे, पंचायत समिती सदस्य अनिल रटाटे, सौ. दिप्ती घडशी, माजी सभापती भाई पोस्टुरे, सरपंच प्रमिला दळवी, निवासी नायब तहसिलदार सुदर्शन खानविलकर, श्रीमती शेवडे, जितेंद्र दवंडे, तुषार करावडे सर्पमित्र सुनील कदम, मुख्याध्यापक रामचंद्र कापसे, महसुल मंडळ अधिकारी मनोहर पवार, निलेश गोडगासे, अनिल गायकवाड यांच्यासह महसुल, कृषी, पंचायत समिती, आरोग्य विभाग, पोस्ट कार्यालयाचे अधिकारी, मंडळातील सर्व तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित यावेळी बोलताना श्री. गुरव पुढे म्हणाले, तालुक्यात कुंबळे व शेनाळे येथील मंडळांची शिबीरे यशस्वी





झाली आहेत तसाच प्रतिसाद देव्हारे येथे ही मिळाला आहे. जुन महिन्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणीक प्रवेशांचे दाखल्याकरिता मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी व त्यातून अनेकांची होणारी असुविधा लक्षात घेऊनच शासनाचा मार्च एप्रिल व मे महिन्यात राबविला हा महत्वकांक्षी उपक्रम अतिशय प्रभावी रित्या राबविण्याचा निर्णय स्थानीक प्रशासनाने घेतला असून दाखल्या अभावी विद्यार्थ्यांची आयत्यावेळी होणारे गैरसोय या निमीत्ताने दूर होईल. याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील प्रत्येक शाळेपर्यंत महसुल विभागांची यंत्रणा पोहचली असून शाळांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. याशिवाय प्रत्येक गावात प्रत्येक वाडीपर्यंत पोहचून शासन आपल्या दारी या भावनेतून हा उपक्रम यशस्वी कऱण्यासाठी महसुल विभाग काम करीत आहे. या मोहीमेच्या माध्यमातून वेसवी मंडळ व मंडणगड नगरपंचायत हद्दीतही हा उपक्रम राबविला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे निमीत्ताने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रमाणपत्राचे दाखल्यांचे वितरणही करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी कऱण्याकरिता महसुल विभागाचे सर्व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. स्वागत सत्कार समारंभाचे सुत्रसंचालन मंदार गावकर यांनी केले.

# नागोठण्यात भिम जयंती महोत्सवाची जय्यत तयारी

सहसंपादक -: नारायण म्हात्रे

नागोठणे विभाग शाखा क्र. ३ यांचे विद्यमाने विश्वरत्न विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव शनिवार २५ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह नागोठणे एसटी बस स्थानक शेजारी आयोजित करण्यात आला आहे.ङ्क या जयंती महोत्सवात विविध सामाजिक कार्यक्रम होणार असून सकाळी ९ वा. पंचशील ध्वजारोहण श्रामणेर संघ नागोठणे विभाग यांच्याकडून पुजापाठाने होणार असून दु. ३ ते सायं. ७ वा. पर्यंत भगवान तथागत गौतमबुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांची नागोठणे शहरातून भव्य मिरवणूक, सायं. ७.३० वा. बौध्दजन पंचायत समिती नागोठणे शाखा क्र. ३ अध्यक्ष समाजभूषण शांताराम नामा गायकवाड (भाऊसाहेब) यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रमुख वक्ते राज्यशास्त्र विभाग विद्यापीठ - मुंबई प्राध्यापक डॉ मृदुळ निळे व स्वागताध्यक्ष चंद्रकांत गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभा आयोजित केली आहे. ङ्क सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे अध्यक्ष नगरसेवक परिषद मुंबई- रामभाऊ जगदाळे, राष्ट्रवादी



काँग्रेसचे नेते व भाएसो अध्यक्ष किशोर जैन, जिप सदस्य सुमित काते, नागोठणे ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया महाडीक, उपसरपंच अखलाक पानसरे यांच्या सह प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार असून या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौ. पं. स. शाखा क्र. ३ उपाध्यक्ष, संपूर्ण कोकणचे प्रसिद्ध गितकार प्रभाकर ओव्हाळ व सचिन सुमित शेलार हे करणार आहेत. तद्नंतर रात्री १० वा. व्हिजे म्युझिक ऑर्केस्ट्रा मुंबई सुप्रसिद्ध भिमक्रांतीचा यल्गार आयोजन केले असल्याची माहिती अध्यक्ष संजय जाधव, उपाध्यक्ष अॅड. प्रकाश कांबळे यांनी दिली. या जयंती महोत्सव कार्यक्रमासाठी उत्सव कमिटी अध्यक्ष संजय जाधव, उपाध्यक्ष तथा नागोठणे ग्रामपंचायत सदस्य अॅड. प्रकाश कांबळे, सचिव दिलीप गायकवाड, सहसचिव अनंत शेलार, खजिनदार दिपक दाभाडे, सहखजिनदार अरविंद गायकवाड यांच्यासह सल्लागार कमिटी अध्यक्ष संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कमिटीचे सदस्य मेहनत घेत आहेत.



**रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन शुभेच्छा देताना भाजप जिल्हा नेते किशोरभाई म्हात्रे, भाजप रोहा तालुका सरचिटणीस मोरेश्वर म्हात्रे, रामचंद्र पाटील, विशाल म्हात्रे, कृष्णा काटकर, प्रकाश करजेकर, नयन पाटील, राकेश म्हात्रे, विशाल वा. म्हात्रे, किशोर नाईक आदीजण दिसत आहेत.(छाया-: नारायण म्हात्रे)**

# जुन्या आठवणींना उजाळा, २८ वर्षानंतर मित्र-मैत्रिणींचा स्नेहमेळा

शेनाळे प्रतिनिधी :-मंडणगड जि. रत्नागिरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या १९९७-९८ बॅचचे गेट-टुगेदर उत्साहात पार पडले. २८ वर्षानंतर भेटलेल्या माजी विद्यार्थ्यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून जुन्या आठवणींना उजाळा देत शिक्षक आणि मित्र मैत्रिणींच्या उपस्थितीमध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली त्यानंतर उपस्थित श्री.वाघमारे सर, श्री. होमकर सर, श्री.कामेरीकर सर, श्री.आटपाटकर सर , श्री.घाडगे सर या सेवानिवृत्त शिक्षकांचा तसेच सौ.पाटील मॅडम (मुख्याध्यापिका लाटवण हायस्कूल), शाळेचे मुख्याध्यापक श्री.हुलगे सर,




उपमुख्याध्यापक श्री.हुल्लोळी सर, पर्यवेक्षक श्री.बैकर सर तसेच इतर शिक्षक व कर्मचारी वृंद यांचा शाल व श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील किस्से सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला.बॅच कडून दोन टीव्ही संच व ब्लूटूथ स्पीकर शाळेला भेट देण्यात आले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी श्री.राकेश मर्चंडे( कृषी मंडळ अधिकारी, मंडणगड ) यांनी केले.

# ‘अर्थ ग्रुप’मध्ये २००० कोटींचा महाघोटाळा!

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दिल्लीमध्ये ईडीने पुन्हा एकदा मोठी कारवाई करत रिअल इस्टेट क्षेत्रातील एका मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे. ‘अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड’ आणि त्याच्याशी संबंधित कंपन्यांशी हे प्रकरण निगडित आहे. ईडीच्या दिल्ली विभागीय कार्यालयाच्या पथकाने १० एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी दिल्ली आणि गुरुग्राममधील १० ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकले.

या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दागिने, सोन्याच्या विटा आणि महागडी घड्याळं जप्त करण्यात आली आहेत. ‘पीएमएलए’ कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून ज्या ठिकाणी छापे टाकले गेले ती सर्व ठिकाणं ‘अर्थ ग्रुप’चे संचालक आणि संबंधित संस्थांशी जोडलेली आहेत.

छापेमारीदरम्यान ईडीने सुमारे ६.३ कोटी रुपये रोख, ७.५ कोटी रुपयांचे दागिने, चांदीच्या विटा आणि महागडी घड्याळं जप्त केली आहेत. हे संपूर्ण प्रकरण मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित असून, या प्रकरणाची सुरुवात दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नोंदवलेल्या पाच एफआयआरमुळे झाली होती. या तक्रारींमध्ये अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि त्यांच्या संचालकांवर फसवणूक, गुन्हेगारी कट आणि विश्वासाचा भंग केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

सीरियस फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन ऑफिसने देखील कंपनी कायद्याच्या कलम ४४७ अन्वये प्रवर्तक आणि संचालकांविरुद्ध गुन्हेगारी तक्रार नोंदवली आहे. तपासात असे समोर आले आहे की, अर्थ ग्रुपने ‘ए१३ँ’ या ब्रँडच्या नावाखाली दिल्ली-एनसीआर, गुरुग्राम, ग्रेटर नोएडा आणि लखनौमध्ये अनेक मोठे रिअल इस्टेट प्रकल्प सुरू केले होते. यामध्ये अर्थ टाऊन, अर्थ सफायर, अर्थ कोपिया, अर्थ टेकवन यांसारख्या अनेक प्रकल्पांचा समावेश होता.

लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठी आश्वासने

कंपनीने लोकांना आकर्षित करण्यासाठी मोठी आश्वासने दिली होती, जसे की वेळेत फ्लॅट किंवा कमर्शियल युनिट देणे आणि गुंतवणुकीवर चांगला परतावा देणे. या आश्वासनांवर विश्वास ठेवून १९,४२५ हून अधिक लोकांनी आपल्या आयुष्याची कमाई यात गुंतवली. तपासात असे उघड झाले आहे की, कंपनीने या गुंतवणूकदारांकडून सुमारे २०२४.४५ कोटी रुपये गोळा केले.

गुरुग्राम, दिल्ली, राजस्थानमध्ये जमिनीची खरेदी

गुंतवणूकदारांकडून घेतलेला पैसा प्रकल्पासाठी वापरण्याऐवजी तो इतरत्र वळवण्यात आल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे. या पैशाचा वापर गुरुग्राम, दिल्ली आणि राजस्थानमध्ये स्वत:च्या आणि कुटुंबीयांच्या



# मे महिन्यात शिक्षकांचे राज्यव्यापी प्रशिक्षण

मुंबई : राज्यात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीसाठी नवीन अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने मे महिन्यात राज्यव्यापी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हे प्रशिक्षण राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर अशा तीन स्तरांवर घेण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू होणार असल्याने हे प्रशिक्षण त्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन परिषदेने केले आहे. मे महिन्यात होणा-या प्रशिक्षणाचे वेळापत्रकही परिषदेने जाहीर केले आहे. राज्यस्तर प्रशिक्षण ४ ते ७ मे, जिल्हास्तर प्रशिक्षण ११ ते १४ मे आणि तालुकास्तर प्रशिक्षण १८ ते ३० मे या कालावधीत होणार आहे. मराठी व उर्दू माध्यमांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असून, अन्य माध्यमांच्या शिक्षकांचे प्रशिक्षण हे मराठी माध्यमांच्या शिक्षकांसोबत करण्यात येणार आहे. उर्दू माध्यमाच्या शिक्षकांसाठी राज्यस्तर व जिल्हास्तर असे दोनच स्तर होणार असून, मराठी माध्यमाच्या शिक्षकांसाठी तीन स्तरांत प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे.



प्रशिक्षणाचा कालावधी निश्चित

इयत्ता दुसरीसाठी तीन दिवस, तर तिसरी आणि चौथीसाठी चार दिवस प्रशिक्षण असणार आहे. प्रत्येक वर्गात अपेक्षित विषयांच्या निर्धारित तासिका पूर्ण होतील याची काळजी प्रशिक्षण कालावधी निश्चित करताना घेण्यात आली आहे.

प्रशिक्षणाची जबाबदारी ‘डाएट’कडे

जिल्हा व तालुका स्तरावरील प्रशिक्षणाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेवर (डाएट) सोपविण्यात आली आहे. प्रशिक्षण घेणा-या एकूण शिक्षकांच्या संख्येनुसार ६० शिक्षकांचा गट तयार करण्यात येणार आहे. त्यानुसार प्रशिक्षण स्थळ, तज्ज्ञांची निवड व अन्य पूर्वतयारी करण्याची जबाबदारी ‘डाएट’वर सोपवली आहे. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक प्रशिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय विद्या प्राधिकरण आणि ‘डाएट’ यांच्यात समन्वय राखण्यात येणार आहे. तसेच राज्यस्तरीय प्रशिक्षणासाठी अनुभवी शिक्षक, अभ्यासक्रम निर्मितीतील तज्ज्ञ, व्याख्याते आणि पर्यवेक्षकीय अधिकारी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

अनुदानित व विनाअनुदानित शाळांसाठी वेगळी तरतूद

शासकीय व अनुदानित शाळांमधील शिक्षकांना देण्यात येणा-या प्रशिक्षणाचा खर्च राज्य सरकार करणार आहे. मात्र, विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांना त्यांच्या शिक्षकांसाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण आयोजित करावे लागणार आहे.

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

यंदा होणार कमी वर्षाव

नेमेचि येतो मग पावसाळा ... अशी उक्ती प्रचलित आहे.अर्थातच ऋतुचक्राप्रमाणे दरवर्षी साधारणपणे जून महिन्यात आपल्याकडे पावसाळा सुरु होतो आणि ऑक्टोबर महिन्यात पावसाळा संपतो. मात्र अलीकडच्या काही



दशकांमध्ये निसर्गाचे हे ऋतुचक्र विस्कटत चाललेले दिसतेय. ऐन नोव्हेंबर,डिसेंबर महिन्यात किंवा अगदी एप्रिल महिन्यात देखील अवकाळी पाऊस कसळु लागलेला आहे. त्यामुळे अर्थातच प्रामुख्याने शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान होतेय. राज्याचा हवामान शास्त्र विभाग दरवर्षी पावसाचा अंदाज वर्तवत असतो. मागील दोन वर्षात सरासरीच्या तुलनेत पावसाचे प्रमाण हे कितीतरी अधिक होते. मात्र यंदा एल निनो चा प्रभाव असल्यामुळे कमी वर्षाव होणार असल्याचे भाकीत स्कायमेट या खाजगी हवामान अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवले आहे. याच अनुषंगाने स्कायमेटने व्यवस्थापकीय संचालक शास्त्रज्ञ जतीन सिंग यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ यंदाच्या मान्सूनचा पहिला अंदाज नेमका काय आहे?

स्कायमेट या हवामान शास्त्र विभागाच्या अंदाजानुसार यंदा एल निनो चा प्रभाव असल्यामुळे सरासरीपेक्षा यंदा पावसाचे प्रमाण हे कमी असणार आहे.जून ते सप्टेंबर या चार महिन्यात ८६८.६ मिलीमीटर या दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्के अधिक किंवा उणे ५ टक्के




पावसाची शक्यता आहे. जानेवारी २०२६ मध्ये सक्यमेटने जे मूल्यांकन केलेलं होते तोच अंदाज कायम आहे. दीड वर्षाच्या ला नीना स्थितीनंतर प्रशांत महासागर एन्सो स्थितीसाठी अनुकूल झालेला आहे २एल निनो म्हणजे नेमका काय प्रकार आहे?

एल निनो हि पॅसिफिक महासागरातील विषुववृत्तीय भागात निर्माण होणारी एक नैसर्गिक हवामान प्रक्रिया आहे. ज्यामध्ये समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यांपेक्षा जास्त उष्ण होते. हि घटना दार २ ते ५ वर्षांनी घडते. आणि त्यामुळे जागतिक हवामानं,वाऱ्याचा प्रवाह आणि मान्सूनवर देखील त्याचा परिणाम होतो. या एल निनोमुले यंदा भारतात सरासरीच्या तुलनेत खूप कमी पाऊस पडणार आहे. एल निनो मुले मध्य आणि पूर्व पॅसिफिक महासागराच्या पाण्याचे तापमान असामान्य वाढून उष्णतेमुळे ढगांची निर्मिती आणि वाऱ्याची दिशा बदलते ज्याचा परिणाम मान्सूनवर होतो. ३ एल निनोची हि नैसर्गिक स्थिती टाळता येणे शक्य नाही का?

एन्सो घटकांव्यतिरिक्त इंडियन ओशन डायपोलचाही मान्सूनवर प्रभाव असतो. हंगामात एक मनबुत सकारात्मक आयपोडी तटस्थ किंवा सकारात्मक राहणायचा अंदाज आहे. यामुळे मान्सूनचं सुरवातीला चांगलं हातभार लागेल. मात्र हंगामाच्या दुसऱ्या टप्प्यात मान्सून कमकुवत होण्याची शक्यता आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार मध्य व पश्चिम भागातील मुख्य मान्सून पर्जन्य क्षेतारत अपुरा पाऊस पडण्याची शकयता आहे. . २ अर्थभान

कॅप्री ग्लोबल कॅपिटलचा ₹५०० कोटींच्या रोख्यांच्या विक्रीचा पहिला टप्पा घोषित

कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेडने (‘‘कंपनी‘‘) सुरक्षित, मानांकन प्राप्त, सूचीबद्ध आणि परतफेडयोग्य अपरिवर्तनीय रोखे नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (एनसीडी)च्या सार्वजनिक विक्रीचा पहिला टप्पा गुरुवारी जाहीर केला. या रोखेविक्रीतून एकूण ₹५०० कोटी रुपयांपर्यंत निधी उभारला जाणार असून, यामध्ये ₹१,०० कोटींचा मूळ आकार (बेस इश्यू साइझ) निश्चित करण्यात आला असून, अधिक प्रतिसाद मिळाल्यास जास्तीचे ४०० कोटी रुपये स्वीकारण्याचा ग्रीन शू पर्याय कंपनीने खुला ठेवला आहे.‘‘

कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश शर्मा म्हणाले, ‘‘सुरक्षित, मानांकन प्राप्त, सूचीबद्ध आणि परतफेडयोग्य अपरिवर्तनीय रोख्यांच्या पहिल्या टप्प्यातील विक्रीचा शुभारंभ जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. कॅप्री ग्लोबल कॅपिटलमध्ये, आम्ही आमच्या चार कर्ज विभागांद्वारे म्हणजेच एमएसएमई कर्जे, गृह कर्जे, सोने तारण कर्जे आणि बांधकाम वित्तपुरवठा विविध प्रकारची सुरक्षित आणि तारण-आधारित कर्जे उपलब्ध करून देतो.‘‘

अपरिवर्तनीय रोख्यांच्या या सार्वजनिक विक्रीद्वारे गुंतवणूकदारांना २४ महिने, ३६ महिने, ६० महिने आणि १२० महिने असे गुंतवणुकीचे विविध कालावधीचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, गुंतवणूकदार मासिक किंवा वार्षिक स्वरूपात व्याजाची रक्कम स्वीकारण्याचा पर्याय निवडू शकतात आणि त्यांना वार्षिक ९.५० टक्क्यांपर्यंतचा व्याजदराचा लाभ (कूपन रेट्स) मिळविता येईल३ चला पर्यटनाला मेघालयातील जग प्रसिध्द डॉकी तलाव मेघालय हे ईशान्य भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे.

मेघालयमध्ये अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत. येथे तुम्हाला पर्वत रांगा, उंच पठार, सुंदर धबधबे, नद्या, हिरवी कुरण तसेच नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळेल. मेघालयची राजधानी शिलाँग हे पर्यटनासाठी अतिशय लोकप्रिय ठिकाण आहे. मेघालयची राजधानी शिलाँग हे एक सुंदर हिल स्टेशन आहे. या हिल स्टेशनच्या आजूबाजूला हिरवाई दिसते. सुंदर धबधबे आणि उंच टेकड्या आणि सुंदर जंगलांच्या मधोमध असलेल्या या शहरात सर्व सुविधाही उपलब्ध आहेत. मेघालयमध्ये स्थित, डॉकी तलाव त्याच्या सौंदर्यासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या तलावाचे पाणी अगदी काचेसारखे चमकते आणि स्वच्छ आहे. पावसाळ्यात डक्की तलावाचे दृश्य अधिकच सुंदर होते. पावसाळ्यात उमंग टोक नदीवर बोट शर्यतीचे आयोजन केले जाते, त्यात सहभागी होऊन मन प्रसन्न होते.चेरापुंजी जगातील सर्वाधिक पाऊस पडण्यासाठी प्रसिद्ध आहे. तसेच हे ठिकाण खूप हिरवेगार आणि सुंदर आहे, जिथे अनेक धबधबे आहेत. निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण योग्य आहे. चेरापुंजीला झाडांच्या मुळापासून विकसित नैसर्गिक पूल आहेत, तसेच डवकी, नोहकालिकाई, मवस्माई गुहा ही चेरापुंजीची प्रमुख पर्यटन स्थळे आहेत.मेघालयला गेले तर मौसिनराम सहलीला जाऊ शकतात. पावसाळ्याचा आनंद लुटण्यासाठी इथे येऊ शकता.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार, १२ एप्रिल २०२६ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## ठाकरे शिवसेनेचे जेष्ठ कार्यकर्ते शेखर लवेकर यांचा भाजपात प्रवेश जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांनी केले स्वागत

चिपळूण : उद्धव ठाकरे शिवसेना पक्षात मागील ३० वर्ष काम करणारे चिपळूण शहरातील खेंड विभागातील विभाग प्रमुख शेखर लवेकर यांनी शनिवारी भारतीय जनता पार्टीचे उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपा प्रवेश केला. ङ्गशहरातील ब्राह्मण साहेब संघ येथे शनिवारी चिपळूण शहर मंडल भाजपा तर्फे शहर अध्यक्ष शशिकांत मोदी आणि भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने शहरातील मान्यवर, चेअरमन,संचालक यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस आणि माजी मुख्यमंत्री खासदार नारायण राणे यांच्या वाढदिवसानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य सोहळ्यात शेखर लवेकर यांनी भाजपा प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाचे विचार व ध्येयधोरण तसेच जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांचे नेतृत्व आवडल्यामुळेच मी आज पक्षप्रवेशाचा निर्णय



घेतला असून पक्ष देईल ती जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडीन असे पक्ष प्रवेशाच्या वेळी बोलताना शेखर लवेकर म्हणाले.ङ्ग लवेकर यांचे शिवसेनेतही उल्लेखनीय काम होते. भविष्यात त्यांना भाजपमध्ये सन्मानच मिळेल. जिथे-जिथे आमची गरज भासेल, तिथे आम्ही पूर्ण ताकदीने शेखर लवेकर यांच्या पाठीशी उभे राहू, असे सांगून शेखर लवेकर यांचे भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांनी भाजपमध्ये स्वागत केले.

# नेरेपाडा मधील जलजीवन योजनेचे काम रखडले

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई,नेरेपाडा येथील जलजीवन मिशन योजनेचे जवळपास ३०% टक्के काम पुर्ण झाले असुन अद्याप ७०% टक्के काम पुर्ण होणे बाकी आहे.मात्र हे काम ब-याच महीन्यापांसुन ठेकेदाराच्या जाणुन बुजुन दुर्लक्षामुळे रखडल्याचे दिसण्यांत येते.नेरेपाडा येथील या योजनेचे काम ८५ लाख रुपयांचे असुन फक्त विहिरीचेच काम पुर्ण झालेले असुन गांवामधे पाईप लाईन टाकुन पुर्ण झालेली आहे.वितरण वाहिनीचे देखील किरकोळ काम शिल्लक आहे.तसेच या ठिकाणी असलेल्या पंपीग मशिनरी,पंप हाउस,आणि फिल्टरचे काम बाकी आहे.मात्र गेल्या अनेक महीन्यापांसुन ठेकेदाराच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे येथील कामे पुर्ण झालेली नाही.ही कामे वेळेवर व्हावी यासाठी येथील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.त्यानंतर ठेकेदाराला पाणी पुरवठा विभागाकडुन सहा नोटीसा पाठविण्यांत येवुन सोबत दंड ठोठावल्याची अतिरिक्त नोटीसा पाठविण्यांत आल्या.मात्र मुजोर ठेकेदाराकडुन काहीही उत्तर देण्यांत आलेले नसल्याचे कळते.त्यामुळे हे काम कधी सुरु होणार आणि जलजीवन मिशन कधी पुर्ण होणार असा सवाल येथील नागरिक करीत आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

मंडणगड प्रतिनिधी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाचे उप मुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळ यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक शांताराम बैकर,शिक्षक प्रतिनिधी बसवंत शिरगिरे, राजकुमार सूर्यवंशी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाचे सहा.शिक्षक प्रमोद जाधव यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली.जयंतीचे औचित्य साधून १० विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली.विद्यालयाचे उप मुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांनी महात्मा ज्योतिबा फुले एक थोर भारतीय समाज सुधारक, विचारवंत आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांनी स्त्री शिक्षण,अस्पृश्यता निवारण आणि बहुजन समाजाच्या उत्थानासाठी ऐतिहासिक कार्य केले.१८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. तसेच १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली अशा विविध गोष्टींविषयी माहिती सांगितली. शेवटी विद्यालयाच्या सहा. शिक्षिका व सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



## महात्मा ज्योतिराव फुले यांचं सामाजिक कार्य : भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पाप्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड

रत्नागिरी, दि. कराडकर बेलोसे महाविद्यालयात आज महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.ङ्गकार्यक्रमात प्रा. सुरेश खरात यांनी महात्मा फुले यांचे जीवनकार्य, सामाजिक योगदान आणि त्यांच्या विचारांची महत्ता याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी फुले यांच्या शिक्षणप्रेमी वृत्तीचा, स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्याचा आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभारलेल्या लढ्याचा विशेष उल्लेख केला.ङ्गयावेळी प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी आपल्या भाषणातून महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या काळातही फुले यांच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी त्यांचे विचार आचरणात आणावेत, असे आवाहन केले.ङ्गया कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




## तु. बा. कदम महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी स्नेहमेळावा २०२६' चे दिमाखात आयोजन

खेड : कुणबी शिक्षण प्रसारक संस्था, खेड-मुंबई संचलित, तुकाराम बाबुराव कदम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भरणे येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा २०२६ चे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, १९ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.ङ्गङ्ग''पुन्हा एकदा आठवणींच्या अंगणात, पुन्हा एकदा आपल्या महाविद्यालयात!'' या ब्रीदवाक्याखाली होणाऱ्या या सोहळ्याचे अध्यक्षस्थान कुणबी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव मा. ॲड. तुकाराम लक्ष्मण डफळे भूषवणार आहेत. या कार्यक्रमाला श्री. भि. म. गोवळकर, श्री. द. भि. धुमक, श्री. राजाभाऊ बैकर, श्री. बाबाराम तळेकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. व्ही. एन. साळुंखे उपस्थित राहणार आहेत.ङ्गङ्गकार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९:३० वाजता नोंदणी आणि स्वागताने होईल. त्यानंतर दीपप्रज्वलन व उद्घाटन सोहळा पार पडेल. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थी संवाद, ज्यामध्ये विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले माजी विद्यार्थी आपल्या यशोगथा आणि महाविद्यालयीन आठवणी उपस्थितांसमोर मांडणार आहेत. दुपारच्या सत्रात स्नेहभोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असेल.ङ्गङ्गया मेळाव्याचे नियोजन माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव श्री. प्रविण जाधव आणि अध्यक्षा प्रा. नाजिया खतीब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अनेक वर्षांनंतर आपले जुने मित्र आणि मार्गदर्शक गुरुजनांना भेटण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.ङ्गङ्गमहाविद्यालयाच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे असून, या सोहळ्याला सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे पदाधिकारी आणि माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे




भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )